२८६

४१

मुख्य लेखा परीक्षक,
स्थानिक निधी लेखा,
महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,
कोंकण भवन,सहावा मजला,
नवी मुंबई.

7 JUL 2003

**कार्यालयीन आदेश क्रं.९६५ दिनांक : /६/२००३.**

विषय :- **नगरपरिषद लेखा परीक्षणांनंतर हाती घ्यावयाची ग्राम पंचायत विभागाच्या लेखा परीक्षणाबाबतची स्थिती**

संदर्भ :- या कार्यालयाचे पत्र क्रं. स्था.१८/ब/सभा/एएसए/७०४
दि. ६ मे २००३.

दि. ८ व ९ एप्रिल २००३ रोजी नाशिक येथे आयोजित केलेल्या स्थानिक निधी लेखा विभागाच्या विभागीय उपमुख्य लेखा परीक्षक यांच्या बैठकीत ग्रामपंचायत विभागाकडील ग्रामनिधी,जवाहर रोजगार योजना आणि ग्रामसमृध्दी योजनेच्या प्रलंबित लेखा परीक्षणाबाबत सविस्तर चर्चा होऊन खालीलप्रमाणे निर्णय घेणेत आला आहे.

१) ग्रामनिधी,जवाहर रोजगार योजना आणि जवाहर ग्रामसमृध्दी योजना याबाबतचा लेखा परीक्षणाचा त्रैमासिक दौरा कार्यक्रम विभागीय उपमुख्य लेखा परीक्षक यांनी मंजूर करण्याच्या पूर्वीच्या बैठकीत घेतलेला निर्णय रद्द करण्यांत आला आणि त्याऐवजी आता हे त्रैमासिक कार्यक्रम मंजूर करण्याचे अधिकार जिल्हास्तरीय उपमुख्य लेखा परीक्षक यांना राहतील. मात्र या कार्यक्रमाची एक प्रत विभागीय उपमुख्य लेखा परीक्षक यांना पाठविण्यात यावी. विभागीय उप मुख्य लेखा परीक्षक यांना आवश्यकता वाटल्यास त्यांना अपवादात्मक प्रकरणी या कार्यक्रमात बदल करण्याचा अधिकार राहील.

२) ज्या ग्रामपंचायतीचे उत्पन्न रुपये एक लाखाचे वर आहे अशा ग्रामपंचायती महाप्रधान ग्रामपंचायती समजण्यात याव्यात.

३) महा ग्रामपंचायतीचे लेखा परीक्षणाचे बाबतीत दरमहा किमान १० टक्के महाप्रधान ग्रामपंचायतीचे किंवा दरमहा कमीतकमी एका महाग्रामपंचायतीचे चाचणी लेखा परीक्षण उपमुख्य लेखा परीक्षक यांनी करावे. चाचणी लेखा परीक्षण करताना जवाहर रोजगार योजना, जवाहर ग्रामसमृध्दी योजना आणि यशवंत ग्रामसमृध्दी योजना यांचादेखील चाचणी लेखा परीक्षणात समावेश करावा.

मुख्य लेखा परीक्षक,
स्थानिक निधी लेखा,
नवी मुंबई.

प्रत माहिती तथा पुढील कार्यवाहीस्तव अग्रेषित.

१. उपमुख्य लेखा परीक्षक(वरिष्ठ) स्थानिक निधी लेखा, सर्व
२. उपमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, सर्व
३. उपमुख्य लेखा परीक्षक (परास/अहवाल/आस्थापना)
४. सहाय्यक लेखा परीक्षाअधिकारी (अहवाल/परास)
५. मुख्य लेखा परीक्षक कार्यालयातील संबंधित कर्मचारी.
६. अभिलेखापाल ( २ प्रती)